## प्रेस नोट-

### जनतेकडून खंडणी मागणा-या टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई –

---

खडक पोलीस स्टेशनचे हददीमधील अब्दुल गणी खान व त्याचे साथीदार हे गोरगरीब जनतेस, व्यावसायिकास मारहाण करणे, धमकी देवून त्यांच्याकडून पैसे मागणे, प्रसंगी अपहरण करणे, हॉटेल व्यावसायिकांकडून दमदाटी करून फुकट जेवणे, अशा प्रकारचे गंभीर गुन्हे करीत होते.सदरची संघटित टोळी ही अब्दुल गणी खान याच्यां नेतृत्वाखाली सन २००४ पासून पुणे शहरात कार्यरत होती.अब्दुल गणी खान याने वेगवेगळ्या साथीदारांसह खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, मारामारी, खंडणी यासारखे एकूण १० गुन्हे केलेले आहेत.त्यास सन २०१२ मध्ये पुणे शहर व जिल्हयातून दोन वर्षाकरीता हदपार करण्यात आले होते.

त्यांचे साथीदार अक्षय नाईक, अक्रम पठाण, अक्षय माने यांच्याविरूध्द सुध्दा पुणे शहरात खंडणी मागणे, दरोडयाची तयारी करणे, गंभीर दुखापत करणे, अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.यातील अक्रम पठाण यास सुध्दा सन २०१२ मध्ये पुणे शहरातून हदपार करण्यात आले होते.

वरील गुन्हेगारांचेविरूध्द वेगवेगळयाप्रकारची प्रतिबंधक कारवाई करूनसुध्दा त्यांचे गुन्हेगारी कृत्यांमध्ये फरक पडत नव्हता. म्हणून त्यांच्याविरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(२,(३)(४) प्रमाणे कारवाई करण्याकरीता राजेंद्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खडक पोलीस स्टेशन यांनी अपर पोलीस आयुक्त, मा.सेनगांवकर यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता. त्याप्रमाणे मा. अपर पोलीस आयुक्त श्री.सेनगांवकर यांनी आरोपी (१) अब्दुल गणी खान, रा .घोरपडे पेठ, पुणे (२) अक्षय राजेश नाईक रा.घोरपडे पेठ, पुणे. (३)अक्रम नासिर पठाण रा.औध, डीपी रोड, पुणे (४)अक्षय अंकुश माने रा.घोरपडे पेठ, पुणे यांचे विरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ अन्वये कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

गेल्या सहा महिन्यामध्ये जबरी चोरी करणा-या,खंडणी मागणा-या,टोळीयुध्द करणा-या वगैरे ९ गुन्हेगार टोळयांचेविरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

---